स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड विद्यापिठाच्या मानव्य विद्याशाखेचे

अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.पदवी करिता सादर करावयाचा

संशोधन आराखडा

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्री संतांचे ऐतिहासिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास

★ संशोधक ★

तोंदुलवार गंगाधर लालू

(एम.ए.इतिहास सेट,नेट)

★ मार्गदर्शक ★

डॉ.विजय पांडुरंग कुलकर्णी

वै.धुंडा महाराज देगुलकर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

सन २०१९ -२०२०

संशोधन आराखडा (संशोधनाची रूपरेषा)

संशोधन विषय : "मध्ययुगीन महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रीसंतांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास "

१) प्रस्तावना

२) संधोधन विषयाची उद्दिष्टे

३) संशोधन विषयाची आवश्यकता

४) संशोधनाची गृहीतके

५) संशोधना पद्धती

६) संशोधनाची वर्गवारी

७) संशोधन विषयची व्याप्ती व मर्यादा

८) आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा (संशोधन विषयाचे वेगवेगळेपण)

९) संशोधन विषयाचे महत्व

१०)संदर्भ सूची

संशोधक विद्यार्थी संशोधक मार्गदर्शक

तोंदुलवार गंगाधर लालू डॉ.विजय पांडुरंग कुलकर्णी (एम.ए.इतिहास सेट,नेट) वै.धुंडा महाराज देगुलकर महविद्यालय देगलूर जि.नांदेड

मध्यकालीन महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रीसंतांचे ऐतिहासिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना –

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे.मध्ययुगीन काळात अनेक संतानी समाजाला दिशा देण्याचे कार्य केलेले आहे.त्यात संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामापर्यंत अनेक संतानी भक्ती मार्गाचा अवलंब करून समाजात असणा-या अंधश्रद्धा,भेदभाव नाहीसे करण्याचे कार्य केले.तत्कालीन समाज अस्मानी आणि सुलतानी संकटांनी ग्रस्त झाला होता.अशा काळात महत्वाची भूमिका पार पाडण्याचे कार्य संतानी केलेले आहे.

संतानी पुढील कार्य करून समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य केलेले आहेत .

१) समाजाचे प्रबोधन घडवून आणले.
२) संकटाच्या क्षणी कसे वागावे या संतांच्या उपदेशामुळे लोकांना मोठा मानसिक आधार मिळून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.
३) समाजात झालेल्या धर्माच्या अवनत अवस्थेत धर्माचा खरा अर्थ सांगून संतानी लोकांचे रक्षण केले.
४) सर्वसामान्याच्या कार्यात लोकांना उपदेश करून समाजाचे नैतिक आचरण सुधारले.

मध्ययुगीन काळात समाजात निर्माण झालेले दोष संतानी दूर केले.त्यात त्यांनी समाजात असणारी अंधश्रध्दा कमी करण्याचे कार्य केले.कर्मकांडाचे स्तोम माजले होते,समाज दैववादाच्या आहारी गेला होता,प्रयत्न शीलता नष्ट झाली होती.संतानी आपल्या कार्याने समाजातील या दोषांवर बोट ठेऊन हे दोष नाहीसे केले.पंढरपूर येथील विठ्ठल हे दैवत संतांचे प्रेरणा स्थान होते.भजन,कीर्तन,काला (सहभोजन),नामस्मरण या माध्यमातून संतानी समाजात समानतेचा संदेश दिला.माणुसकी व मानवधर्माची शिकवण संतानी दिली.

मध्ययुगीन काळात ज्या संतानी मोलाचे योगदान दिले त्यात पुरुष संतांबरोबरच स्त्रीसंतानी देखील महत्वाचे कार्य केलेले आहे,.,मध्ययुगीन काळात अवघा समाज विविध समस्यांनी ग्रासलेला होता.या काळात स्त्रीसंतानी दर्शविलेली भूमिका खूप महत्वाची आहे.विविध स्त्रीसंतानी महत्वाची

भूमिका बजावली आहे.त्यात संत जनाबाई , संत बहिणाबाई पाठक,संत मुक्ताबाई,संत कान्होपात्रा,संत महदंबा,संत सोयराबाई,संत वेणाबाई ,संत निर्मळाबाई यांचे योगदान खूप महत्वाचे आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये पुरुष संतानी महत्वाचे कार्य केलेले आहे.संत पुरुषांच्या जोडीला समाजातील महिला संतानी पुढे येऊन आपलाही खारीचा वाटा उचलला.लोककल्याण करण्याच्या कार्याचा वसा महाराष्ट्रातील महिला संतानी यथार्थपणे पुढे चालविला.संतांच्या कार्याचे व त्यांच्या प्रतिभेचे दर्शन घडविण्यासाठी त्यांच्या रचनाचा तसेच त्यांच्या कार्याचा शास्त्रीय अभ्यास करावा लागेल.

संधोधनाची उद्दिष्टे :

१) महिला संतानी समाज प्रबोधनात केलेल्या वाटचालीवर प्रकाश टाकणे.
२) प्रतिकूल परिस्थितीतून महिला संतानी कसा मार्ग काढला ते स्पष्ट करणे.
३) महिला संतांच्या अभंगवाणीतून संवादाची प्रक्रिया कथन करणे.
४) मध्ययुगीन स्त्री जाणिवांचा अभ्यास करणे
५) सर्वसामान्याचे अध्यात्मिक उद्बोधन करणे.
६) सर्व सामान्यांना सहज आकलन होईल असे अध्यात्मिक निरुपण करणे.
७) लोक संस्कृतीतील अभ्यास करणे.

- **संशोधन विषयही आवश्यकता :**

मध्ययुगातील स्त्रीसंतानी समाज प्रबोधनाच्या कार्यात पुढाकार घेऊन परिवर्तनाला एक नवे परिमाण दिले.त्यांनी प्रत्यक्ष रचनात्मक समाज कार्य करून माणूस घडविण्याचा प्रयत्न केला.कुटुंब ग्रामजीवन तसेच पंचक्रोशीतील लोकांचे अनेक विधिध प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्यासाठी महिला संतानी जे काम केले त्याला इतिहासात तोड नाही,परंतु या काळातील ऐतिहासिक बदल व त्यामुळे समाजावरील परिणाम यांचा या संत स्त्रियांच्या वाङमयाचा अभ्यास अद्याप झालेला नाही.तो व्हावा या उद्देशाने हा विषय निवडण्यात आलेला आहे.

- **संशोधनाची गृहीतके:**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेऊन खालील काही गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१) महाराष्ट्राच्या संत वाङमयामध्ये स्त्री संतानी वेगळे स्थान निर्माण केलेले दिसून येते.
२) मध्ययुगीन काळातील स्त्रीयांना अनेक सामाजिक बंधनांना सामोरे जावे लागले होते.
३) एकूण संत वाङमयामध्ये स्त्री संतांच्या वेगळेपण दिसून येते.
४) स्त्री संतानी अनेक काव्य प्रकार हाताळलेले दिसून येतात.
५) मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये समाजाला सामाजिक भान प्राप्त करून देण्यामध्ये स्त्री संतांची महत्वाची भूमिका दिसून येते.
६) स्त्रीयांच्या वाङमयीन रचनेच्या आधारे तत्कालीन परिस्थिती समजण्यास मदत होते.
७) ऐतिहासिक वाङमयीन प्रकार व त्यात झालेले काळानुरूप बदल अभ्यासता येतात.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक आणि विश्लेशात्मक संशोधन संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक आणि गुणात्मक आशय विश्लेषण संशोधन पद्धतीचा अवलंब शोध कर्त्याकडून केला जाणार आहे.

- **तथ्य संकालाची पद्धत :**

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधकाला त्या संशोधनासंबंधी माहिती व तथ्य सामग्री संकल करावी लागते त्यासाठी साधारण दोन पद्धती आहे.त्या म्हणजे प्राथमिक स्त्रोत आणि द्वितीय स्त्रोत होत.

प्रस्तुत विषयाच्या ऐतिहासिक संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतामधून माहिती संकलित केली जाईल.प्रस्तुत विषयावर प्रकाशित झालेल्या मान्यवरांच्या संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला जाईल.तसेच वृत्तपत्रे,इंटरनेट,नियत कालिके इत्यादी मान्यवरांच्या लेखाचा आधार प्रसंगानुरूप व आवश्यकतेनुसार घेतला जाईल.

- **तथ्य विश्लेषण आणि निर्वाचन प्रक्रिया :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने जी माहिती संकलित करणार आहे त्या माहितीच्या आधारे वस्तुनिष्ठपाने विश्लेषण करून निष्कर्ष स्थापित करण्याचा प्रयत्न शोधकर्ता करणार आहे.

• प्रकरणाची वर्गवारी :

प्रकरण १ : विषय प्रवेश

प्रस्तुत प्रकरणात विषयची निवड,संशोधनाची व्याप्ती व मर्यादा संशोधन विषयाचे महत्त्व आणि पद्धतीशास्त्राचे स्पष्टीकरण संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे यांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण २ : मध्ययुगीन महाराष्ट्रातील ऐतिहासिक ओळख

या प्रकरणात मध्ययुगीन महाराष्ट्रातील ऐतिहासिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येईल

प्रकरण ३ : मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाज जीवन

मध्ययुगात समाजातील व्यक्ती अंधश्रधा,कर्मकांड,भेदाभेद या अनिष्ठ प्रथांनी ग्रासलेल्या होता.विषमतेवर आधारलेली जातीनिष्ठ समाज रचना ,व्यक्तीची इच्छा किवा पात्रता लक्षात न घेता तिला जन्मापासून मरणापर्यंत बांधून ठेवणारी होती.म्हणून ऐतिहासिक दृष्टीकोण समोर ठेऊन या प्रकरणात मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाज जीवनाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ४ : मध्ययुगीन महाराष्ट्रातील स्त्री संत

या प्रकरणात मध्ययुगीन महाराष्ट्रातील स्त्रीसंत संत जनाबाई , संत बहिणाबाई पाठक,संत मुक्ताबाई,संत कान्होपात्रा,संत महदंबा,संत सोयराबाई,संत वेणाबाई ,संत निर्मळाबाई यांचे जीवन चरित्रा विषयी माहितीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ५ : मध्ययुगीन महाराष्ट्रातील स्त्रीसंतांची कामगिरी

या प्रकरणात स्त्री संतांच्या कार्यात स्त्रीसंतांचे वेगवेगळेपण व त्यांचे कार्य व योगदान बद्दलची माहितीचा आढावा व ऐतिहासिक संदर्भ शोधून विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण ६ : उपसंहार

सर्व प्रकरणाची मांडणी करण्यात येईल तसेच गृहीतकाची पडताळणी केली जाईल.शेवटी संशोधनातून हाती आलेल्या निष्कर्षाचा व उपाय योजनांचा आढावा घेण्यात येईल.

संशोधन विषयची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय “मध्यकालीन महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रीसंतांचे ऐतिहासिक योगदान :एक चिकित्सक अभ्यास “ अश्या स्वरूपाचा आहे.सदरील संशोधनात मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीसंतांच्या कार्याएवढी या संशोधनाची व्याप्ती आहे.तसेच इ.स.१२९० ते १६०० इसवी सन पर्यंतचा कालखंडामध्ये स्त्रीसंत अभ्यासाला जाणार असल्यामुळे हि त्याची एक मर्यादा आहे.

आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा :

आतापर्यंत महाराष्ट्रातील इतिहासातील विविध संत महात्मांच्या चरित्र व कार्यावर विपुल प्रमाणात लेखन झालेले असून ते प्रामुख्याने ज्ञानेश्वर महाराज तसेच इतर संत वाङमयाचा दृष्टीकोन समोर ठेऊन संशोधन झालेले आहे.मात्र ऐतिहासिक दृष्टीकोनातून अध्याप संशोधन झालेले नाही. महाराष्ट्रातील स्त्रीसंतांच्या ऐतिहासिक कार्याचा व त्यांच्या अध्यात्मिक बाबीवर तसेच तत्कालीन परिस्थितीवर या संशोधानामार्फात प्रकाश टाकण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

मध्ययुगीन काळात भारतात विविध संत होऊन गेले.या संतांच्या मालिकेत स्त्रीसंताचा व त्याच्या अध्यात्मिक साहित्याचा सिहाचा वाटा आहे.अनुकूल समाज रचना नसताना घरातील परिस्थिती योग्य नसताना,दारिद्र्य,सामाजिक कुचंबना,कौटुंबिक छळ या सगळया गोष्टी सहन करून स्त्री संतानी अध्यात्मिक साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे.संत जनाबाई,मुक्ताबाई,समर्थ शिष्या वेणाबाई ,महदंबा,कान्होपात्रा,निर्मळाबाई ,सोयराबाई अशा अनेक स्त्री संतानी अध्यात्मिक कार्य आणि काव्य निर्मिती केली आहे.तत्कालीन समाजाशी संवाद साधणारे त्यांचे जीवनकार्य होते.आपल्या साहित्याने त्यांनी अध्यात्मिक क्षेत्रात आगळे वेगळे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

महाराष्ट्रातील स्त्री संतांचे वाङमयीन अध्यात्मिक कार्य मोलाचे आहे.त्यांच्या या कार्याचे ऐतिहासिक योगदान प्रकाशात यावयाचे आहे.त्यामुळे त्यांचे कार्य इतिहासाच्या दृष्टीने आकलन करावयाचे आहे कारण कुठलाही समाज हा महिलांच्या कर्तुत्वाने अधिक प्रकाशमान होत असतो.

महिला संतानी घडविलेले योगदान भूतकाळात जसे प्रेरक ठरले तसे वर्तमानकाळात समाजाला नवी दिशा देऊ शकते त्यामुळे महिला संताच्या कार्याचा प्रवाह संवाद शास्त्राच्या दृष्टीने अभ्यासणे अधिक उपयुक्त ठरू शकते.मध्ययुगाच्या अध:कारमय परिस्थितीतून बाहेर पडून महिला संतानी जे विचार जागरण घडविले ते इतिहासाला कलाटणी देणारे ठरले.

राजकीय सत्ता प्रतिकूल होती.समाजजीवन अस्थिरतेने ग्रासलेले होते.सांस्कृतिक आक्रमणाच्या अप्रत्यक्ष संघर्षाची परिस्थिती लोक अनुभवत होते.अशा वेळी समाजाचे स्वत्व जपण्यासाठी महिला संतानी जे योगदान दिले त्याचा अभ्यास या प्रबंधात करावयाचा आहे.

मध्ययुगीन महिला संतानी आपल्या अभंगातून(काव्य रचनातून) तत्कालीन समाजाचे सखोल चिंतन केले आहे.याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे .त्यांच्या साहित्यावर ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास झालेला नाही.त्यामुळे या प्रबंधात महिला संतांच्या अध्यात्मिक संवादाचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे.म्हणून मी हा विषय निवडला आहे.

संदर्भ सूची :

१) रां.ची.ढेरे – विठ्ठल महांसमन्वय,श्री विद्याप्रकाशन,शनिवार पेठ पुणे

२) डॉ.सतीश बडवे-मध्ययुगीन साहित्य विषय,मीरा बुक्स & पब्लिकेशन २०१

३) प्रा.गं.बा.सरदार – संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती,लोक वाङमय प्रकाशन मुंबई पा.आ.२००८

४) बा.र.सुंठणकर – महाराष्टीय संत मंडळाचे कार्य, वाङमय गृह मुंबई

५) डॉ.यु.म.पठाण - संत साहित्य : चिंतन औरंगाबाद

६) डॉ.यु.म.पठाण – महानुभाव साहित्य संशोधन खंड १९७३,औरंगाबाद

७) गोसावी र.रा.- पाच भक्ती सांप्रदाय,प्रतिभा प्रकाशन पुणे.

८) डॉ.यु.म.पठाण-मध्ययुगीन मराठी संत साहित्य काही आयाम,स्वरूप प्रकाशन औरंगाबाद आ.प.२००३

९) डॉ.सुहासिनी इर्लेकर – संत कवी आणि कवियित्री एक अनुबंध,२००६ स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे

१०) डॉ.सुहासिनी इर्लेकर- जनाबाईचे निवडक अभंग एक चिंतन,प्रकाशक : रंगनाथ जोशी औरंगाबाद

११) भोसले एस.एस.,मोहरीर – संताची अभंगवाणी,कीर्ती प्रकाशन

१२) डॉ.नीला पांढरे – मराठी संताचे योगदान आणि संत साहित्याची समीक्षा

१३) प्रा.रां.ची.ढेरे –महाराष्ट्राचा देव्हारा,पुणे १९७८

१४) प्रा.बाळकृष्ण लळीत – श्री संत मुक्ताबाई चरित्र

१५) डॉ.शोभा पाटील – संत कवियीत्रीच्या संत संवेदना

१६) डॉ.शोभा इंगवळे,प्रतिभा गोळे – जनाबाईचे अभंग :स्त्रीमनाचा हृदयआविष्कार

१७) वामन नारायण देशपांडे – महदंबा आध्य मराठी कवियित्री,कॉन्टीनेन्टलप्रकाशन पुणे-२

१८) गोरे दादा – महादंबचे धवळे

१९) यु.म.पठाण – लीळाचरित्र

आधारभूत ग्रंथ :

१) संत जनाबाई – अभंग संग्रह-१
२) संत जनाबाई- अभंग संग्रह-२
३) कान्होपात्रा संकल्प गाथा
४) मुक्ताबाई – ताटीचे अभंग

संशोधक विद्यार्थी संशोधक मार्गदर्शक तोंदुलवार गंगाधर लालू
डॉ.विजय पांडुरंग कुलकर्णी(एम.ए.इतिहास सेट,नेट) इतिहास विभाग प्रमुख
वै.धुंडा महाराज देगुलकर महविद्यालय देगलूर जि.नांदेड